सागर प्रकाशनचे
सांजवार्ता
गुरुवार, दि. ६ सप्टेंबर २०१२

# बालकामगार मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**बालकामगार शाळेतील विद्यार्थी शिक्षक दिनाचा आनंद घेऊन शिक्षक दिन साजरा करताना दिसत आहेत.**

औरंगाबाद, दि. ६ (सांजवार्ता ब्युरो) : आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे संचलित राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प शाळा क्र. २ पडेगाव येथील बालकामगार विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या व मदिहा फातेमा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना व पालकांना बालमजुरी पासून होणारे अनेक दुष्परिणाम सांगून मुलांना जास्तीत जास्त प्रमाणात शिक्षणाकडे कसे आकर्षित करता येईल हे समजून सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक सय्यद अमजद, शेख तमन्ना, खान सायमा, शमशाद पठाण आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.